**महाराष्ट्र शासन**

298
2/2/2012
14-0

क्र. बैठक-२०११/प्र.क्र.२२२/नवि-२०
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-10 जानेवारी, २०१२.

प्रति,

१. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
२. संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.

विषय :- केंद्र शासनाचे जननी - शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविण्याबाबत.

महोदय,

गरोदर मातांना व नवजात अर्भकांना सार्वजनिक रुग्णालयांमध्ये संपूर्ण सेवा मोफत पुरविणेबाबत मा.केंद्रीय आरोग्य मंत्री भारत सरकार यांनी मा. मुख्यमंत्री यांना कळविले आहे. त्याचप्रमाणे सर्व राज्यांच्या आरोग्य मंत्र्यांच्या बैठकीमध्ये सुध्दा सर्व माता व अर्भकांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्याबाबत निर्णय झाला आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे दि. ०७ व ०८ जुलै,२०११ रोजी दिल्ली येथे झालेल्या सर्व राज्यातील सचिव (आरोग्य) व अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांच्या बैठकीमध्ये केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार राज्यामध्ये जननी- शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका यांचेमार्फत चालविल्या जाणाऱ्या आरोग्य संस्था यांनी गरोदर मातांना व ०-३० दिवस वयाच्या नवजात अर्भकांना मोफत आरोग्य सेवा देणे आवश्यक आहे. यासंदर्भात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या दि.१४ जुन, २०११ च्या पत्रान्वये सदर कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी काही महत्त्वाच्या सुचना दिल्या आहेत. त्याची प्रत सोबत जोडली आहे. सदर सुचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

२. सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांनी ५% निधी महिला व बाल कल्याण याकरीता खर्च करणे अपेक्षित आहे. सदर निधीचा विनियोग "जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रमा"वर खर्च करता येईल. वरील सर्व बाबी विचारात घेता "जननी - शिशु सुरक्षा कार्यक्रम" अंतर्गत गरोदर मातांना व नवजात अर्भकांना मोफत सेवा देण्याबाबत कृपया सत्वर कार्यवाही व्हावी, ही विनंती.

(सीमा ढमढेरे)
सहसचिव, नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

D:\shefali\JSSK\janani_shishu_suraksha.doc